ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राजश्री शाहू महाराज, मुस्लिम समाज आणि उत्क्रमशील धर्मविचार



**Dr. Ladaf S. K.**
**Department of History, Azad Mahavidyalaya, Ausa, dist.Latur, Maharashtra .**

## प्रस्तावना

शाहू महाराज 'मराठा' संस्थानिक असले तरी ते केवळ मराठ्यांचे राजे नव्हते; त्यांच्या संस्थानात असलेल्या हिंदू, जैन, मुस्लिम ,पारसी, ख्रिश्चन आदी सर्व जाती धर्माच्या लोकांचे ते राज्य होते. त्यांची स्वतःची अशीच भावना होती. मुस्लिम समाजाविषयी त्यांनी विशेष आस्था दाखवल्याचे दिसून येते. हिंदुस्तानातील हिंदू व मुस्लिम या दोन्ही समाजात परस्परांविषयी विश्वासाची व सामजस्याची भावना रहावी, ही त्यांची इच्छा अगदी १८९४ साली ते राज्यासनारूढ झाल्यापासून व्यक्त झालेली आहे. १८८३ साली मुंबईत प्रथम हिंदू-मुस्लिमांच्या जातीय दंगली झाल्या आणि त्याच्या , पुढच्याच साली पुण्यात गणेशोत्सवाच्या सुमारास त्यांचे पडसाद उमटले. याची दंगली होऊन उभय समाजांतील संबंध तणावग्रस्त झाले. लोकमान्य टिळकांनी हिंदूंची बाजू घेतली होती टिळकपक्षियांवर सरकारने खटलेही भरले होते. या पार्श्वभूमीवर पुण्यात नूतन छत्रपती शाहू महाराज यांचा सत्कार सार्वजनिक सभेने घडवून आणला होता. सार्वजनिक सभेच्या वतीने गोपाळ कृष्ण गोखले यांनी महाराजांना द्याच्या मानपत्राचे वाचन केले. या सत्काराला उत्तर देताना केलेल्या छोट्याशा भाषणात महाराजांनी पुण्यात नुकत्याच झालेल्या हिंदू-मुस्लीम दंगलीची खास उल्लेख करून सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांना 'त्यांनी हिंदू आणि मुस्लीम यामध्ये शांततेचा समेट घडवून आणावा' म्हणून सल्या दिल्याची नोंद आहे. त्याचा अर्थ हिंदू-मुस्लिम समाजांची परस्परांविषयीची सौहार्दाची भावना ही काळाची गरज असल्याची जाण महाराजांचे ठिकाणी १८९० च्या दशकातच उत्पन्न झाली होती. ही त्यांची भावना त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत राहिली. १९२० सालच्या एका भाषणात त्यांनी हिंदू आणि मुस्लीम हे एकाच राष्ट्राचे भिन्नभिन्न अवयव आहेत असे म्हटले आहे.[1]

## मुस्लिम समाजातील शिक्षण प्रसाराची तळमळ

तत्कालीन समाजात एक ब्राह्मण सोडल्यास मराठा व इतर तत्सम जाती, लिंगायत, जैन, मुस्लिम अशा सर्वच जाती शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या होत्या; आणि जोपर्यंत त्यांना शिक्षणाची गोड लागत नाही तोपर्यंत त्या मागासलेलेच राहणार अशी खंत शाहू महाराजांना होती. आणि म्हणूनच या विविध जातींत शिक्षणाविषयी जागृती व्हावी, अशी त्यांची धडपड होती. मुस्लिम समाजाची शिक्षणासाठी पुढे यावा असे त्यांना वाटत होते. १९०२ साली महाराज इंग्लंडच्या दौऱ्यावरून सुखरूप परतल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ कोल्हापुरात मुसलमानांनी एक समारंभ आयोजित केला होता. या समारंभाचे निमित्त साधून मुस्लीम पुढाऱ्यांनी आपल्या समाजाच्या शिक्षणासाठी जनजागृतीची चळवळ उभारावी, शैक्षणिक संस्था स्थापन कराव्यात; तसे केल्यास दरबाराकडून त्यांना पूर्ण सहाय्य मिळेल, असे आश्वासन महाराजांनी दिले होते. पण तत्कालीन मुस्लिम समाजात शिक्षणाविषयी अनास्था इतकी पराकोटीची होती की, महाराजांनी त्यांच्या समोर उभे केलेल्या सुवर्ण संधीचा फायदा घ्यावा असे त्यांना वाटले नाही. मुस्लिम समाज थंडच राहिला. परंतु महाराज थंड बसले नाहीत. त्यांनी मुस्लीम समाजातील शिक्षणेच्छू १० विद्यार्थ्यांना कोल्हापुरात नुकत्याच स्थापन केलेल्या 'विक्टोरिया मराठा बोर्डिंग' मध्ये प्रवेश देऊन संस्थानातील मुस्लिमांच्या

शिक्षणाच्या श्रीगणेशा केला. उपरोक्त दहा विद्यार्थ्यात कर्नाटकातील अथणी गावाचा शेख महंमद युनूस अब्दुल्ला हा एक विद्यार्थी होता. हा पुढे राजाराम कॉलेजमधून ग्रॅज्युएट झाल्यावर त्यास महाराजांनी आपल्या संस्थानात 'मामलेदार' म्हणून नियुक्त केले. मुस्लिम समाजात शिक्षणाची गोडी लावण्याचे काम ही त्यांच्यावर सोपवले गेले. दरम्यान १९०६ साली शाहू महाराजांनी आपणहून पुढाकार घेऊन मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित मंडळींची सभा बोलवली व 'मोहमेडन एज्युकेशन सोसायटी, ची स्थापना केली; स्वतः महाराज या संस्थेचे अध्यक्ष बनले आणि युसूफ अब्दुल्लांना कार्यवाह बनवले, हा निर्देश यापूर्वी येऊन गेलाच आहे. विशेष म्हणजे महाराजांनी संस्थानातील नानाविध जाती-धर्माच्या लोकांच्या त्यांच्या समाजातील शिक्षण प्रसारासाठी विद्यार्थ्यांची वसतिगृहे संस्थापन करण्यास उद्युक्त केले होते व भरघोस साहाय् ही दिले होते, पण कोणाही वस्तीग्रह संस्थेचे ते पदाधिकारी बनले नव्हते. मुस्लिम समाजाबद्दल मात्र त्यांनी अपवाद केला. त्यांच्या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले, ही बाब त्याच्या मुस्लिम समाजासंबंधीच्या आस्थेची द्योतक होती. त्या समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन त्यांच्या मागासलेपणा जावा म्हणून महाराजांची ही सर्व खटपट चालू होती. शेवटी त्यास यश येऊन मुस्लिम बोर्डिंग सुरू करण्यात आले. संस्थानातील मुस्लीम देवस्थानांची उत्पन्ने या बोर्डिंगच्या संस्थेला जोडण्यात आली. असाच देवस्थानचे उत्पन्न सांगतेला देणारा महाराजांचा एक हुकूम उपलब्ध आहे. त्यात ते म्हणतात, "कोल्हापुरात मागासलेल्या लोकांची बोर्डिंग स्थापन झाली आहेत. मुसलमानांच्या बोर्डिंग शिवाय इतर जातींची बोर्डिंग चांगल्या प्रकारे चालली आहेत. मुसलमान बोर्डिंगाची सांपत्तिक स्थिती चांगली नाही. इतर जातींप्रमाने मुसलमान लोक सुशिक्षित होणे इष्ट आहे. त्यांचे संस्थेस पैशाची सोय झाल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारेल असे वाटत नाही. सबब कसबा रूकडी, पेटा हातकणंगले येथे श्री हजरत पिराचे प्रस्था करिता दर्ग्याचे रिपेरी करिता वगैरे ५०० रू. ठेवून घेऊन बाकीची सर्व रक्कम 'सेक्रेटरी टू दि किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर' याजकडे दरसाल पाठविणे मंजूर केले आहे. सदरची रक्कम सोसायटीचे नियमाप्रमाणे खर्च होण्याची आहे - २८ जून १९११ अशाच प्रकारे कोल्हापूर शहरातील 'निहाल मसिद, घोडपिर, बाबुजमाल व बाराईमाम' या देवस्थानांचे उत्पन्न ही मुस्लिम बोर्डिंग ला देण्यात आले. [2]

लवकरच चौफळ्याच्या माळावर मराठा बोर्डिंग जवळच २५ हजार चौ. फुटांची मोकळी जागा मुस्लिम बोर्डिंग साठी दिली गेली. तसेच इमारतीसाठी साडेपाच हजार रुपयांची देणगी व संस्थानातील जंगलातून मोफत सागवान देण्यात आली. महाराजांचे गुरु फ्रेझरसाहेब यांच्या हस्ते बोर्डिंगची पायाभरणी मोठ्या थाटामाटात केली गेली. यथावकाश च्या जागेवर दूमजली भव्य इमारत उभी राहीली. महाराजांनी या संस्थेस दरबाराकडून २५० रुपयांचे वार्षिक अनुदान आणि वार्षिक सहा-सात हजार रुपये उत्पन्न येईल एवढ्या जमिनी बहाल केले. मुस्लिम समाजातील मुलांनी शिकावे म्हणून महाराजांनी अक्षरशः भरभरून दान केले होते. इतके दान मराठा बोर्डिंगच्याही पदरी पडले नव्हते. याचे कारण मराठ्यांच्याहून मुसलमान शिक्षणाच्या बाबतीत अधिक उदासीन होते. तेव्हा अशा समाजाकडे अधिक लक्ष द्यावे असे महाराजांना वाटत होते. आणखी असे की एक धर्म ही बाब सोडल्यास मुसलमान हे बहुजन समाजहून, विशेषतः मराठ्यांहून, फारसे भिन्न आहेत, असे त्यांना वाटत होते. हुबळीच्या ब्राह्मणेतर परिषदेत त्यांनी म्हटले होते, "मुसलमान हे नेहमी मराठ्यांप्रमाणे शास्त्र क्रम करितात. त्यांच्या चालीरीतीही एक मराठ्यांप्रमाणे आहेत. मराठ्यांच्या फौजेत मोठमोठे मुसलमान सरदार होते. त्याप्रमाणे मुसलमानांच्या फौजेत मराठे सरदार होते. हल्ली इंग्रज सरकारचे फौजेत मराठे व मुसलमान खांद्यास खांदा लावून लढले आहेत." महाराजांच्या या उदगारावर भाष्य करताना मुस्लिम सत्यशोधक समाजाचे एक कार्यकर्ते हुसेन जमादार यांनी म्हटले आहे की, "अशा प्रकारे मुसलमान समाज हा या देशात कोणी परका नसून तो इथल्या बहुजन समाजाचाच एका भाग आहे हे वास्तव समाजमनावर ठसविण्याचा प्रयत्न राजर्षींनी जाणीवपूर्वक केलेल्या दिसून येतो"[3]

## हिंदू-मुस्लीम एक्यवर भर, कुराणाचे मराठी भाषांतर, धर्मस्थळांना देणग्या

आपल्या संपूर्ण कारकीर्दीत शाहू महाराजांनी हिंदू-मुस्लीम भावनिक व सामाजिक एक्यावर भर दिला. त्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतली व अनेक प्रयोगही केले. त्यातील एक प्रयोग मोठा लक्षणीय आहे. तो असा की एका समाजाच्या देवस्थानाच्या उत्पन्नाचा काही भाग दुसऱ्याच्या देवस्थानाला खर्ची लावावा म्हणून त्यांनी काही हुकूम काढले. उदाहरणार्थ, पाटगावाच्या मौनी बुवांच्या मठाच्या उत्पन्नातून काही रक्कम तेथील मुसलमानांच्या मशिदीचे बांधकाम खर्चासाठी मदत म्हणून देण्याचा एकूण उपलब्ध केले. विशेष म्हणजे हा हुकुम युवराज राजाराम महाराजांच्या सहीने काढला गेला आहे. रुकडीतील पिराच्या देवस्थानाच्या उत्पन्नातील काही भाग तेथील अंबाबाईच्या मंदिरातील दैनंदिन दिवाबत्ती साठी खर्च होत होता. अशा

प्रकारचा आणखी एक प्रयोग राजकन्या आक्कासाहेब महाराज यांच्या विवाहाच्या निमित्ताने केला गेला. याप्रसंगी अनेक मराठा वधूवरांचे विवाह लावले गेले. त्यासोबत काही मुस्लीम जोडप्यांची ही विवाह साजरे केले गेले. या सर्व नवपरिणीत जोडप्यांच्या हयातीभराच्या भत्तयाची व्यवस्थाही लावली गेली.

मराठ्यांच्या इतकाच मुस्लिम समाजाही महाराजांना तितकाच जवळचा वाटत होता हेच यातून स्पष्ट होते. शिवछत्रपतींप्रमाणेच शाहू महाराजांनी परधर्मीय म्हणून मुस्लिम लोकांचा कधीच तिरस्कार केला नाही; उलट त्यांच्या धर्माविषयी नेहमीच आदर बाळगला, याची अनेक उदाहरणे शाहू चरित्रात विखुरलेली आहेत. कुराण हा धर्मग्रंथ अरबी भाषेत असल्याने त्याचा अर्थ सामान्य मुसलमानांना समजत नव्हता. कुराणातील धर्मतत्वांचा अर्थबोध सामान्यासही झाला पाहिजे, अशी इच्छा महाराजांनी बाळगून त्याचे मराठीत भाषांतर करण्याचे काम त्यांनी सुरू केले होते. त्यासाठी कोल्हापूर दरबारची २५ हजार रुपयांची मोठी रक्कम मी खर्ची घातली होती. दुर्दैवाने महाराजांच्या अकाली निधनाने हे काम पूर्ण झाले नाही. महाराजांच्या या उपक्रमावर टिप्पणी करताना हुसेन जमादारांनी म्हटले आहे, "कुराणाचे भाषांतर वेळीच पूर्ण झाले असते तर मुस्लीम सुधारणावादी प्रवाह फार अधिक कोल्हापुरातून सुरू झाला असता यात शंका नाही. कारण आजची मदरसा मधून जी कुरान चे शिक्षण दिले जाते ते पाठांतरापलीकडे काही नसते. धर्मग्रंथाच्या खरा अर्थ अनुयायास कळला तर मुल्ला-मौलवींची मक्तेदारी संपते व धार्मिक अंधश्रद्धा ही कमी होऊन समाज सुबुद्ध होतो, या जाणिवेनेच महाराजांनी मुस्लिम समाजाच्या प्रबोधनाचे कार्य हाती घेतले होते, असे म्हणावयास हरकत नाही." शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मुस्लिम समाजाच्या मशिदीसाठीही अर्थसहाय्य व रिकाम्या जागांच्या देणग्या दिल्याचे अनेक दाखले आढळतात. कोल्हापूर शहर वाढत होते. नव्या पेठा वसवि ल्या जात होत्या. अशा नव्या वसाहती मधील मुस्लिम लोकांची नमाज पडण्याची मोठी गैरसोय होत होती. नव्यानेच वसविलेल्या शाहूपुरी या पेठेत मशीदच नव्हते. तेव्हा तेथील मुसलमानांची कुचंबना होऊ नये म्हणून महाराजांनी शाहुपुरी पेठेत जागा तर दिलीच शिवाय मशिद बांधकामासाठी एक हजारहून अधिक रक्कम मंजूर करून दिली. पाटगाव येथील मशिदीसाठी महाराजांनी केलेल्या मदतीचा निर्देश यापूर्वी येऊन गेलाच आहे. आणखी असेच एक उदाहरण कोल्हापुरातील बोहरी लोकांच्या संदर्भात मिळते. बोहरी ही मुस्लीम समाजातील सधन व व्यापारी जात होती. पण त्यांना नमाजासाठी त्यांची स्वतःची मशिद नव्हती. तेव्हा बोहरींचे पुढारी तय्यबअली यांनी महाराजांना सहाय्याची विनंती केली. महाराजांनी कृपावंत होऊन शहराच्या मध्यवस्तीमधील ५ हजार चौरस फुटांची जागा बहरींच्या मशिदीसाठी बहाल केली. महाराजांनी राधानगरी हे नगर नव्याने वसवले. हे नगर वसवित असता त्यांनी प्रजाजणांच्या भौतिक गरजांबरोबरच धार्मिक गरजांकडे ही लक्ष दिले. त्यांनी हिंदूंच्यासाठी दोन मंदिरे बांधली आणि मुसलमांच्यासाठी 'हजरत पीर गैबीसाहेब' आणि 'शहाज महाल' हे दोन देवस्थान निर्माण केली. त्यांना उत्पन्ने लावून दिल. एवढेच नव्हते तर मुस्लीम देवस्थानांना ७५ रुपयांची खास देणगीही दिली. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की मुस्लिम प्रजाजणांच्या शिक्षणासारख्या भौतिक गरजांकडेच नव्हते तर मशिदी, पिरांचे दर्गे यासारख्या त्यांच्या धार्मिक गरजांकडे ही महाराजांनी लक्ष पुरवले होते. मुस्लिमांचे दर्गे, मशिदी आदी धर्मस्थळांना हिंदू राजांनी देणग्या दिल्याचे अनेक दाखले इतिहासात मिळतात; पण त्याही पलीकडे जाऊन त्यांना दरबारच्या खर्चाने मशिदी आणि दर्गे बांधून दिल्याची उदाहरणे आपणास क्वचितच सापडतील. मुस्लिम प्रजाजनांविषयी या राज्याच्या हृदयात किती प्रगाढ प्रेम वसत होते, त्याचा हा निसंशय पुरावा मानावा लागेल.[4]

## विवाह नोंदणीची सक्ती

१९१७ साली मुस्लिम समाजाच्या हिताच्या रक्षणासाठी शाहूमहाराजांनी दोन हुकूम काढले. पहिल्या हुकमान्वये महाराजांनी जाहीर केले की, " मुसलमान लोकांत त्यांचे काजी खेरीज कोणी लग्न लावण्यास हरकत नाही; पण कोर्टात काम पडल्यास काजीने लग्न लाविले असले खरीच कायदेशीर हक्क मानला जाणार नाही. सर्व ऑफिसाकडे सदर हुकुमाची समज मिळणे करिता कळविणेत यावी व गॅझेटमध्ये प्रसिद्धही करावी- ५ जून १९१७." काजी अथवा मौलवी यांनी लावलेल्या लग्नास कायदेशीरपणा प्राप्त व्हावा, म्हणून त्यांच्याजवळ असलेल्या लग्नाच्या रजिस्टरवर 'हुजूर ऑफिसचा शिक्का व सही' घ्यायची सक्ती करणारा दुसरा हुकूम महाराजांनी लवकरच जारी केला. त्यात म्हटले होते, "मुसलमान लोकांत म्हणजे सुन्नी पंथाच्या लोकांत, मलकापूर, बावडा, कागल, करवीर व तोरगल वगैरे ठिकाणी जे काजी हल्ली आहेत ते त्यांच्या ठरलेल्या हद्दीत लग्ने लावित आले आहेत. त्या सर्वांनी लावलेली लग्न कायदेशीर समजली जातील. त्याप्रमाणेच त्यांच्याकडून त्यांच्या हद्दीत लग्न लावण्याचा अधिकार मिळाला त्या मुल्लानी वगैरे व त्यांच्या गुमास्त्यांनी लावलेली लग्न कायदेशीर समजले जातील. प्रत्येक

काजीने व त्यांच्या गुमास्त्याने तलग्न संबंधाने रजिस्टर ठेवून त्यात प्रत्येक लग्न नोंदले पाहिजे. सदरच्या रजिस्टरचा नमुना ज्यांच्या पूर्वी ठरला असेल तसे त्यांनी रजिस्टर जरूरीपुरत्या पानांचे तयार करून त्यावर हुजूर ऑफिसचा शिक्का व सही करून घ्यावी. रजिस्टरास नोंदलेले प्रत्येक लग्न कोर्टातील काम चालविण्यास वगैरे कायदेशीर पुरावा समजले जाईल. याशिवाय इतर लग्न वगैरे कायदेशीर मानली जाणार नाही ९ जुलै १९१७" महाराजांनी मुसलमान धर्मगुरूंचा लग्न लावण्याचा अधिकार मान्य केला, त्यात काहीही हस्तक्षेप केला नाही; पण अशी लग्ने लावली गेल्यावर त्यांच्या रजिस्टरवर सरकारी नोंदणीचे कायद्याने बंधन घातले गेले. ही गोष्ट मुसलमानांच्या, विशेषतः मुस्लिम स्त्रियांच्या, अधिक हिताची होती. स्वतंत्र भारतात आजही काजी अथवा मौलवी यांनी लावलेल्या लग्नाच्या नोंदणीवर सरकारी नोंदणीचा शिक्का होत नाही, म्हणजे जो आवश्यक मानला जात नाही. मुस्लिम विवाहास सरकारी नोंदणी आवश्यक असावी अशी महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक चळवळीची मागणी आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर महाराजांचे पाऊल त्या काळाच्या मानाने किती पुढे पडले होते, याची कल्पना येते.[5]

## गुणी जणांना उदार राजाश्रय

ज्या शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सामान्य मुस्लिम समाजाविषयी इतकी आपुलकी बाळगली त्यांनी मुस्लिम गुणीजणांना उदार राजाश्रय दिल्यास नवल नव्हते. अशा भाग्यवान गुणीजणांत प्रतिभासंपन्न 'शाहीर' लहरी हैदर, चित्रकलेच्या क्षेत्रातील महान कलावंत 'रंगसम्राट' आबालाल रहिमान, अखिल हिंदुस्तानमध्ये आपल्या असामान्य गायकीने ख्यातकीर्त झालेले 'गाणमहर्षी' अल्लादिया खाँसाहेब, खुद्द महाराजांना मल्लविद्येचे धडे देणारे 'मल्लवीशारद' बालेखान वस्ताद हे प्रमुख होते. शाहीर लहरी हैदर तर महाराजांच्या गळ्यातील ताईत बनले होते. महाराजांच्या इतिहास प्रसिद्ध खडखड्या त्यांचे जे नित्याचे सहकारी बसत असत, त्यापैकी हैदर साहेब एक होते. वृत्तीने अवलिया बनलेल्या आबालाल रहिमखान सारख्या सामान्य कलावंताची लहर महाराजांनी मोठ्या आनंदाने सांभाळली होती. अल्लादिया खाँसाहेबांवर त्यांनी बंधूप्रेमाचा वर्षाव केला होता; तर बालेखान वस्ताद यांना त्यांनी दरबारी मानकऱ्यांत स्थान देऊन त्यांची प्रतिष्ठा उंचावली होती . या सर्वच गुणी जणांना कोल्हापूर दरबाराचा केवळ राजाश्रय लाभला होता असे नाही, तर कोल्हापूरच्या राजाची लाख मोलाची माया ही मिळाली होती. या मायेपुढे जगातील कोणताही सन्मान त्यांना फिका वाटत होता. त्यामुळेच अल्लादिया खाँसाहेब यांनी हिंदुस्थानातील सर्वश्रेष्ठ गायक म्हणून मान्यता मिळाल्यावर ही कोल्हापूर सारख्या छोट्या संस्थानाकडे पाठ फिरवली नाही शाहू महाराजांची सेवा करण्यातच त्यांनी आजन्म धन्यता मांडली. अल्लादिया खाँसाहेब यांचे पुत्र भूर्जीखाँ यांच्या संदर्भातील एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. भूर्जीखाँना पित्याच्या गळ्याचा थोर वारसा लाभला होता तथापि खाँसाहेबांकडून गायकीचे धडे घेत असतानाच ऐन मेहनतीच्या वयातच त्यांच्या दुर्दैवाने त्यांना 'मोतीझरा' या आजाराने गाठले व त्याचा परिणाम गळ्यावर होऊन आवाज बिघडून गेला. अनेक उपाय करूनही सुधारणा होईना. तेव्हा खाँसाहेबांनी निराश होऊन त्यांस शिकवण्याचा उद्योग सोडून दिला. शाहू महाराजांच्या कानावर जेव्हा ही गोष्ट गेली तेव्हा त्यांनी भूर्जीखाँना बोलून घेतले आणि महालक्ष्मीच्या मंदिरात रोज एक तास गायन सेवा करण्यासाठी त्यांची खास नेमणूक केली. 'जसे जमेल तसे गा, पण गात राहा' अशी महाराजांची आज्ञा झाली. भूर्जीखाँ महालक्ष्मीच्या मंदिरात रोज आपील गानकलेची हजेरी लावू लागले. रोज साक्तीच्या एक तासाच्या रियाजाने भूर्जीखाँचा गेलेला आवाज पूर्ववत येऊ लागला. इतका की एक दिवस अल्लादिया खाँसाहेब मंदिराच्या जवळून जात असताना त्यांच्या कानावर आपल्या पुत्राचा आवाज पडला आणि तो एकूण ती आश्चर्यचकित झाली. भूर्जीखाँचा आवाज सुधारेल ही आशाच त्यांनी सोडून दिली होती. ही सर्व महाराजांची कृपा होती. खाँसाहेबांनी भूर्जीखाँस पोटाशी धरले आणि मग पुन्हा गायकीचे धडे द्यावयास प्रारंभ केला. हे भूर्जीखाँ पुढे शेवटपर्यंत महालक्ष्मीच्या मंदिरात आपली गायन सेवा करीत राहिले. हा केवळ कलेच्या क्षेत्रातील प्रयोग होता, तर सामाजिक क्षेत्रातील हिंदू-मुस्लिम सदभाव वाढविण्याच्या दिशेने महाराजांनी जाणीवपूर्वक टाकलेला पाऊस होते.[6]

## दर्गे व मशिदी यांना मदत

हिंदू-मुस्लीम ऐक्याचे फक्त विचार भाषणांतून मांडून शाहू महाराज स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपल्या संस्थानात हिंदू व मुस्लिम या दोन्ही समाजांस समान न्यायाने लेखले ही गोष्ट तेवढीच महत्वाची आहे मुस्लिमांच्या अनेक देवस्थानांना त्यांनी उदार मनाने व उदार हाताने मदत केल्याचे अनेक दाखले त्यांच्या कारकिर्दीत दिसून येतात.

१. पन्हाळ्यावरील हजरत पीर सादू खताल यांच्या दर्ग्यास मुस्लिम समाजाच्या मागणीवरून पिण्याच्या पाण्याची खास सोय महाराजांनी करून दिली होती.
२. पाटगाव येथील मशिदीच्या खर्चासाठी सालिना तीनशे रुपये मौनी महाराजांच्या मठाच्या उत्पन्नातून द्यावेत असे हुकूम २ सप्टेंबर १९१९ रोजी तिला. विशेष म्हणजे हा हुकूम युवराज राजाराम महाराजांच्या सहीने महाराजांनी काढलेला आहे.
३. ६ फेब्रुवारी १९०४ रोजी कोल्हापुरातील शाहूपुरी भागातील 'स्टेशन मस्जिद' बांधण्यासाठी महाराजांनी जागा दिली असल्याची नोंद दप्तरी सापडते. पुढे ९ जुलै १९२१ रोजी याच मशिदीला महाराजांनी एक हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.
४. कोल्हापुरातील कसबा बावडा येथील मुस्लिम समाजाने मशिदी करिता जागा मिळावी म्हणून अर्ज दिला होता. तो मंजूर करून १० ऑक्टोबर १९१७ रोजी (मुलकी ठराव क्र. ५४४) प्रमाणे ही सरकारी जागा मुस्लिम समाजास मोफत देण्यात यावी असा आदेश काढण्यात आला.

अशी अनेक उदाहरणे राजर्षी शाहूंच्या कारभारात दाखवून देता येतील. पण यापैकी पाटगाव येथील मशिदीच्या खर्चासाठी सालिना ३०० रू. मौनी महाराजांच्या मठाच्या उत्पन्नातून द्यावेत असे जो हुकूम होता, त्याचे विशेष महत्त्व वाटते. कारण हिंदू धर्मीयांच्या मठाच्या उत्पन्नातून मुस्लिम धर्मियांच्या मशिदीचा खर्च भागवण्याची सोय करणे, हे महाराजांचे कृत्य हेतुपूर्वक नसलेही, परंतु हिंदू-मुस्लिम समाजात एकी निर्माण होण्यास ही घटना फार उपयोगी ठरली आहे यात शंका नाही.[7]

## मुस्लिम कवी व कलावंतांना राजाश्रय

महाराजांनी फक्त मुस्लिम देवस्थानांच देणग्या दिल्या असे नाही, तर मुस्लीम समाजातील कवी, चित्रकार,गायक, पैलवान अशा गुणी जणांच्या गुणांचा गौरव करून त्यांना उदार राजाश्रय दिला. शाहीर लहरी हैदर हे कोल्हापूर चे रहिवासी. कात्र्यांना धार लावण्याचा त्यांचा पिढीजात व्यवसाय. हा व्यवसाय करणारे मुस्लिमांत 'शिकलगार' म्हणवितात. शाहीर लहरी हैदर पोवाडे, लावण्या, जनपद गीत करीत. त्यांच्या काव्यात ऐतिहासिक, सामाजिक व धार्मिक विषय असत. त्यांची रचना रसाळ व शृंगारीक होती. तसेच हिंदू धर्म, राजे-रजवाडे वगैरेंचा इतिहास त्यांनी आत्मसात केला होता. त्यांनी रचलेल्या 'शिवाजी महाराजांचा पोवाडा' प्रसिद्ध पावला होता. 'महाराष्ट्र शाहीर संमेलनात' त्यांना पुरस्कारही मिळाला होता. 'सिंहगडाचा पोवाडा', 'रशियन क्रांतीचा पोवाडा' इत्यादी त्यांच्या प्रसिद्ध रचना होत. पुढे प्रसिद्धीस आलेले शाहीर पिराजीराव सरनाईक हे शाहीर लहरी हैदर यांचे शिष्य होय. राजर्षींनी शाहिराच्या पोटापाण्याची सोय व्हावी म्हणून त्यांच्या पिढीजात व्यवसाय लक्षात घेऊन त्यांना टेक्निकल स्कूल मध्ये नेमून घेतले. पुढे त्यांना त्या स्कूलचे 'सुपरिंटेंडेंट' बनविले. त्यांना राहण्यासाठी घर दिले. पुढे हे शाहीर महाराजांच्या गळयातील ताईत बनले. महाराज आपल्या खडखड्यातून करवीर नगरीत फेरफटका मारत असता या शाहिरांना घेऊन फिरत. एवढेच नव्हे तर फेरफटक्यात जागचे जागी द्यावेत हुकुम त्यांना त्यांच्या नोटबुकात लिहून ठेवण्यास महाराज सांगत. त्यांच्या कवनांनी महाराष्ट्राचा शाहिरी इतिहास घडवला आहे.

महाराजांच्या दरबारातील दुसरे मुस्लिम व्यक्तिमत्व म्हणजे गानतपस्वी अल्लादियाखाँ. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या नवरात्र महोत्सवात हजेरी लावण्यासाठी अल्लादियाखाँ प्रथम कोल्हापुरात आले त्यांचे गाणे ऐकण्यात महाराज तल्लीन झाले. दक्षिणेकडे नसलेले ही घराण्याची गायकी पाहून हा कलावंत आपल्या दरबारी असावा, असे त्यांच्या मनात आले. महाराजांनी त्यांना राजाश्रय देऊन दरबारी गायक बनवले. पुढे-पुढे तर अल्लादियाखाँ यांचे महाराजांची एवढे घनिष्ठ संबंध जुळुन आले की, महाराज खाँसाहेबांना आपले बंधू म्हणून मानू लागले महाराजांच्या पदरी या गुणी कलावंताने अखिल भारतीय कीर्ती संपादन केली. ते 'गानमहर्षि' बनले. अनेक नामवंत गायक-गायिकांना त्यांचे शिष्यत्व पत्करले. ख्यातनाम गायिका केसरबाई यांनी संगीत मधील शेवटचे धडे खाँसाहेबांकडून घेतले भारताचे भूषण ठरलेल्या या गानमहर्षिला महाराज महत्वाच्या प्रसंगी आपल्यासमवेत नेत. १२ डिसेंबर १९१२ रोजी पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोह प्रसंगी दिल्ली दरबार भरला होता. या ऐतिहासिक प्रसंगी राजर्षी खाँसाहेबांना आपल्याबरोबर दिल्लीला नेले होतो. अल्लादियाखाँ म्हणजे हिंदू-मुस्लिम सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक होते. त्यांनी हिंदू देव-देवतांवर आणि चीजा रचल्या. आददाता या रचनेत अल्लादियाखाँनी 'सर्व विश्वाची उत्पत्ती ईश्वरापासून झाली' या गीतेतील विचारधारा मांडली होती.

राजर्षींच्या निधनानंतर वीस वर्षांनी स. १९४२ मध्ये जेव्हा अल्लादियाखाँ परत कोल्हापूरी आले असता करवीरच्या जनतेने उत्स्फूर्तपणे त्यांच्या शाही सत्कार करून महाराणी ताराबाई यांच्या हस्ते खाँसाहेबांना मानपत्र व एक हजाराची थैली अर्पण केली आणि त्यांचा मोठ्या प्रेमाने सन्मान केला. पुढे अल्लादियाखाँ पैगंबरवासी झाल्या नंतर त्यांच्या चाहत्यांनी

कोल्हापुरात खासबाग मैदानाजवळ देवल क्लब समोर त्यांचा पुतळा बसविला. अलीकडे जमातवादी संघटनांनी डोके वर काढून समाजकारणावर व राजकारणावर प्रभाव पाडयला सुरू केल्यावर, एक जमातवादी संघटनेच्या मंडळींनी हा मुसलमान व्यक्तीचा पुतळा आहे म्हणून तो उखडून टाकण्याच्या अश्लाघ्य प्रकार केला. तेव्हा शाहू महाराजांच्या हिंदू-मुस्लिम ऐक्याचा वारसा पुढे चालवणाऱ्या करवीरच्या रसिक जनतेने अल्लादियाखाँ यांच्या पुतळ्याची यथासांग पूर्ववत प्रतिष्ठापना करून राजर्षींनी रुजवलेली हिंदू-मुस्लिम एकतेचे रोप कोमेजलेले नाही हे जगाला दाखवून दिले.

मुस्लिम समाजातील दुसरा महान कलावंत म्हणजे आबालाल रहिमान. या उचलत चित्रकाराला 'कलामहर्षी' बनविले ते राजर्षी शाहू महाराजांनी. आबालाल रहिमान हे चित्रकलेच्या शिक्षणासाठी मुंबईत गेले असता परीक्षेत प्रथम येऊ कशी खात्री असणाऱ्या त्यांना प्रथम क्रमांक न मिळाल्याने त्यांचा अपेक्षाभंग झाला. आपल्यावर अन्याय झाला या भावनेने ते मनाचे संतुलन गमावून बसले. आबालाल रहिमान यांची ही अवस्था पाहून महाराजांना वाईट वाटले. काय कलाकार वाया जाऊ नये म्हणून त्यांनी आबालाल रहिमान यांची सरकारी शाळेत चित्रकलेचा शिक्षक म्हणून नेमणूक केली आबालाल रहिमान मनात येईल तेव्हा शाळेत जात किंवा कोटीतीर्थ तलावाच्या परिसरात रंग कुंचला घेऊन भटकत असत. महाराज यांच्याकडे सहानुभूतीने पाहत होते. त्यामुळे संधी मिळेल तेव्हा आबालाल रहमान गाठून ते त्यांच्या प्रतिभेला आव्हान करीत आणि त्यांना चित्रे रेखाटण्यात प्रवृत्त करीत असत. महाराजांच्या या प्रोत्साहनामुळे आबालाल रहिमान यांच्याकडून अनेक अजोड कलाकृती निर्माण झाल्या. त्यांची अनेक निसर्ग चित्रे अमर झाली. आपल्या सुंदर कलाकृतींनी ते 'रंगसम्राट' म्हणून गणले गेले.

महाराजांच्या कुस्तीच्या आवडत्या क्षेत्रातही त्यांनी मुस्लीम समाजातील पैलवानांना उदार राजाश्रय दिला. कुस्ती क्षेत्रात इमामबक्ष व पंजाबी पैलवानाचा खेळ फुलला तो महाराजांच्या प्रोत्साहनामुळे. या मलविद्येच्या क्षेत्रात कमरूद्दि,न गुलाब मोहिद्दीन, रमजान, खलील पंजाबी, जानी पंजाबी, इमामबक्ष, रहीमबक्ष, हसनबक्ष, गुलाम कादर, रज्जब मुलतानी, महमददिन पंजाबी, कादरबक्ष, महमदबक्ष अशी मुस्लिम मल्लांची फौजच महाराजांनी उभा केली होती. खुद्द शाहू महाराज एक कसलेले मल्ल होते. त्यांना मल्लविद्या शिकवणारे बालेखान वस्ताद के मुस्लिमच होते. महाराज जेव्हा राजकोट व धारवाड येथे शिक्षणासाठी गेले, तेव्हासुद्धा त्यांच्यासोबत बालेखान वस्ताद होतेच. आपल्या या गुरूस महाराजांनी पन्हाळा तालुक्यातील पोर्ले येथे दहा एकर जमीन दिली. कोल्हापुरातील मंगळवार पेठेत एक वाडा दिला होता. तिथे बालेखान वस्ताद राहत. तिथेच एक तालीम होती व राजर्षी तेथे अधून-मधून जात व वस्तादाकडून डाव शिकत. हे बालेखान वस्ताद दरबारचे मानकरीही होते.[४]

## सारांश

छत्रपती राजश्री शाहू महाराज विलायतेहून परत आले तेव्हा त्यांचे निरनिराळ्या समाजाकडून सत्कार आयोजित केले जात होते. तेव्हा कोल्हापूरच्या मुस्लिम समाजानेही महाराजांचा सत्कार आयोजित केला होता सत्काराच्या उत्तरा दाखल केलेल्या भाषणात छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी मुस्लिम समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नसल्याची जाणीव करून दिली. "मुस्लिम मंडळी आपल्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह काढू इच्छित असतील तर आपण त्यांना सर्व सहाय्य करू", असे जाहीर आश्वासन त्यांनी दिले परंतु मुस्लिम समाजाची शिक्षणाबद्दलची इतकी अनास्था होती की त्यांनी काही हालचाल केली नाही. या समाजातील मुले शिकली पाहिजेत म्हणून विक्टोरिया मराठा वस्तीग्रहात दहा मुस्लिम विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा हुकूम छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी दिला. परंतु पाहिजे तेवढा प्रोत्साहन मिळाला नाही. म्हणून महाराजांनी कानडी (कर्नाटक) प्रदेशातील एक मुस्लिम विद्यार्थी - शेख मोहम्मद युसुफ अब्दुल्ला यास प्रयत्नपूर्वक आणून मराठा वस्तीगृहात प्रवेश दिला. पुढे त्याचे उच्च शिक्षण राजाराम कॉलेजमध्ये होऊन तो पदवीधर झाला आणि त्याला महाराजांनी आपल्या सेवेत घेतले. त्याला संस्थानात मामलेदार बनविले. पुढे त्यांनी डेप्युटी कलेक्टर व ट्रेझरी अधिकारी म्हणून काम पाहिले. शेख अब्दुल्लावर मुस्लिम समाजात शिक्षण प्रसाराचे कार्य करण्याची जबाबदारी सोपविली गेली. एकंदरीत कोल्हापुरातील मुस्लिम बोर्डिंग मुळे फक्त संस्थानालाच नव्हे तर जवळपासच्या जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील मुस्लिम विद्यार्थी शिकले आणि आजही शिकत आहेत. हुसेन जमादार यांच्या लेखना वरून शाहू महाराजांच्या केलेले कार्यातून स्फूर्ती घेत हा पेपर प्रसिद्ध करावा असे मला वाटले. कारण या देशांमध्ये छत्रपती राजश्री शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा प्रसार होणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर आज मुस्लिम समाजाची सामाजिक व आर्थिक उन्नती शिक्षणातूनच होऊ शकते.

## संदर्भ

डॉ. जायसिंगराव पवार राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्रस इतिहास प्रबोदणी, १०८ साने गुरुजी वसाहत, राधा नगरी रोड, कोल्हापूर. प्रथमावृत्ती: २५ मे २००१ पुष्ट क्र. १८८

१. किता पृ. क्र. १८८
२. किता पृ. क्र. १८८
३. किता पृ. क्र. १८८-१८९
४. किता पृ. क्र. १९०-१९१
५. किता पृ. क्र. १९१-१९२
६. किता पृ. क्र. १९२-१९३
७. हुसैन जमादार, कोल्हापूर: जयसिंगराव पवार राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, राजश्री शाहू छत्रपती व मुस्लिम समाज, दूतिया आवृत्ती, रिया बुक्स, रोयल पॅलेस, टाकाला कोल्हापूर, पुष्ट क्र. ४९४, जून २००७
८. किता पुष्ट क्र. ४९७-४९८

## संदर्भ ग्रंथ

१. शे. द. जावडेकर आधुनिक भारत, तिसरी आवृत्ती, पुणे
२. स. मा. गार्गे करवीर रियासत, दुसरी आवृत्ती, पुणे
३. करवीर सरकारचे गॅझेट कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर
४. केशवराव भोसले जन्मशताब्दी विशेषांक महाराष्ट्र टाइम्स, सं. गोविंद तळवळकर, मुंबई
५. भ. बा. जाधव राजश्री शाहू महाराजांचे भाषणे, प्रथमावृत्ती, कोल्हापूर
६. य. दि. फडके विसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रथमावृत्ती, पुणे
७. महादेव शास्त्र जोशी भारतीय संस्कृति कोश, खंड – ६
८. शामराव पाटील (संकलक). (सं) भास्कर धतावकर राजश्री शाहू छत्रपतीचे निवडक आदेश, मुंबई